# जाहिरात

वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याकरिता समिती, नंदुरबार

**धडगांव व अक्कलकुवा तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची रिक्त पदे भरण्यासाठी (संक्षिप्त) जाहिरात**

**क्र.जिपनं/आरोग्य/आस्था-१-अ/266/२०१७, दि. 20/०६/२०१७.**

---

जिल्हा समिती, नंदुरबार मार्फत **धडगांव व अक्कलकुवा** तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी, गट-अ दर्जाची रिक्त पदे मुलाखतीद्वारे **(Walk-in-interview)** भरणेसाठी शासनाकडून निर्देश प्राप्त झाले आहेत. सदर पदासाठी अर्जाचा नमुना जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांच्या www.nandurbar.nic.in / www.nandurbar.gov.in या कार्यालयीन अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी सदर अर्ज डाऊनलोड करुन संपुर्णत: भरलेला अर्ज, मुळ प्रतिज्ञापत्र व आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह जिल्हाधिकारी यांच्या नावाने **जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार येथे दिनांक २२/०६/२०१७ ते दिनांक ०१/०७/२०१७ पर्यंत सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** हस्तबटवडयाने / नोंदणीकृत डाकेने मागविण्यात येत आहे.

वरील कालावधीत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी **(Walk-in-interview)** दि. ०३/०७/२०१७ रोजी मुळ कागदपत्रांसह मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार कार्यालयात सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | भरावयाची एकुण पदे |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी गट-अ (M.B.B.S.) | पी.बी. १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४०० | २९ |

वरील पदांसाठीची सविस्तर जाहिरात, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, एकुण रिक्त पदांची संख्या, विहीत परीक्षा शुल्क, अर्ज करावयाची पध्दत, विविध महत्वाचे दिनांक, मुलाखत बाबत तपशील व इतर महत्वाच्या सर्व सुचना सविस्तरपणे जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांच्या www.nandurbar.nic.in / www.nandurbar.gov.in या कार्यालयीन अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**ठिकाण :- नंदुरबार**
**दिनांक :- २०/०६/२०१७**

**(डॉ. आर.बी. पवार)**
**सदस्य सचिव तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**

सही/-xxx
**(डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी )**
**अध्यक्ष तथा**
**जिल्हाधिकारी, नंदुरबार**

महाराष्ट्र शासन

# धडगांव व अक्कलकुवा तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची रिक्त पदे भरण्यासाठी (सविस्तर) जाहिरात

संदर्भ :-

१. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.आरटीआर-१०९१/प्र.क्र.२२६/सेवा-३, दिनांक ३० ऑक्टोंबर २०००
२. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/४५८/प्र.क्र.३७५/०७/सेवा-३, दि. २१ मे २००९
३. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/प्र.क्र.३७५/सेवा-३, दिनांक १० जुन २००९
४. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७/सेवा-३ (निमं.), दिनांक ०२ नोव्हेंबर २०११.
५. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७६/सेवा-३, दि. १४ डिसेंबर २०११.
६. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.मवैअ-२०११/७८९/सेवा-३, दि. १८ जुलै २०१३.
७. शासन पत्र सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१११३/७८९/४४५/सेवा-३, दि. २७ सप्टेंबर २०१३.
८. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७४५/११/सेवा-३, दि. ३ ऑक्टोंबर २०१३.
९. शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१२/निवडमंडळ, दिनांक २६ फेब्रुवारी २०१६.
१०. शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.मवैअ-२०१५/प्र.क्र.७३९/निमं/सेवा-३, दि. २४ जुन २०१६.
११. शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०१५/प्र.क्र.७३९/सेवा-३, दि. २६ ऑक्टोंबर २०१६.
१२. सार्वजनिक आरोग्य विभागाकडील पत्र क्र.मवैअ-२०१६/प्र.क्र.९५/सेवा-३, दि. १९ जुन २०१७.

---

**जाहिरात क्रमांक : क्र.जिपनं/आरोग्य/आस्था-१-अ/२८६/२०१७, दि. २०/०६/२०१७**

---

**१) नंदुरबार जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील धडगांव व अक्कलकुवा तालुक्यातील जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.**

**२) सदरची जाहिरात केवळ अक्कलकुवा व धडगांव तालुक्यातील रिक्त पदांसाठीच असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना अक्कलकुवा व धडगांव तालुक्यातील आरोग्य संस्थेमध्येच नियुक्ती देण्यात येईल. याची सर्व उमेदवारांनी स्पष्टपणे नोंद घ्यावी.**

**३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर सरळसेवेने मुलाखतीद्वारे (Walk-in-Interview) पदभरती करण्यासाठी** www.nandurbar.nic.in / www.nandurbar.gov.in **या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमुना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.**

**४) पात्र उमेदवारांनी अर्जाचा नमूना संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन जिल्हाधिकारी याच्या नावाने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार या कार्यालयात हस्त बटवड्याने / नोंदणीकृत डाकेने दि. २२/०६/२०१७ ते ०१/०७ /२०१७ पर्यंत सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत सादर करावा.**

**५) पदसंख्या :- जिल्हा शल्यचिकित्सक, नंदुरबार यांचे आस्थापनेवरील १३ व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे आस्थापनेवरील १६ अशी एकुण-२९ पदे**

| अ. क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | भरावयाची एकुण पदे |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी गट-अ (M.B.B.S.) | पी.बी. १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४०० | २९ |

** जाहीर करण्यात आल्यानुसार २९ पदांवर खालील नमूद विशेषज्ञ शाखेतील पदव्युत्तर पदविका / पदवीधारक उमेदवारांना विशेष प्राधान्य देण्यात येईल.

१) भिषक
२) बालरोग तज्ञ
३) शल्य चिकित्सक
४) स्त्रीरोग तज्ञ
५) भुल तज्ञ
६) अस्थीव्यंगोपचार तज्ञ
७) नेत्ररोग तज्ञ
८) त्वचारोग तज्ञ
९) शरीरविकृती तज्ञ
१०) क्ष-किरण तज्ञ
११) मानसोपचार तज्ञ
१२) रक्तसंक्रमण अधिकारी

६) **वेतनश्रेणी** :- रु. १५६००-३९१००+ग्रेड वेतन रु. ५४०० व इतर अनुज्ञेय भत्ते शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७६/सेवा-३, दि. १४ डिसेंबर २०११ अन्वये पदव्युत्तर पदविका धारक उमेदवारांना ३ अतिरिक्त वेतनवाढी व पदव्युत्तर पदवी धारक उमेदवारांना ६ अतिरिक्त वेतनवाढी अनुज्ञेय राहतील. त्यामुळे विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांपेक्षा जास्त असेल.

७) **वय** :-

७.१ दि. २० जुन २०१७ रोजी खुला प्रवर्गासाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत नियमाप्रमाणे ५ वर्षे शिथीलक्षम.

७.२ शासकीय वैद्यकीय सेवेत स्थायी / अस्थाई / बंधपत्रित स्वरुपात कार्यरत असणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

**७.३ शासकीय वैद्यकीय सेवेत स्थायी / अस्थाई / बंधपत्रित स्वरुपात केलेल्या सेवेची सर्व प्रमाणपत्रे मुळ अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.**

७.४ शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७४५/११/सेवा-३, दि. ३ ऑक्टोबर २०१३ या मधील नमुद विशेषज्ञ शाखेतील असाधारण किंवा अतिविशेषज्ञ शैक्षणिक अर्हताधारण केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त १० वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

८) **शैक्षणिक अर्हता** :-

८.१ वैद्यकीय अधिकारी गट-अ पदासाठी सांविधीक विद्यापीठाची M.B.B.S. पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसूचित विनिर्दीष्ट केलेली अन्य कोणतीही अर्हता.

८.२ **वैद्यकीय अधिकारी (विशेषज्ञ) पदासाठी** :- सांविधीक विद्यापीठाची बालरोगचिकित्सा किंवा शल्यचिकित्सा किंवा औषधवैद्यक किंवा स्त्रीरोग चिकित्सा किंवा बधिरीकरण किंवा मनोविकृतीशास्त्र किंवा नेत्रशल्य चिकित्सा किंवा क्ष-किरणशास्त्र किंवा विकृतीशास्त्र किंवा अणु जीवशास्त्र शरीर किंवा रक्त संक्रमण या विशेषज्ञ शाखेतील भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसूचित विनिर्दीष्ट केलेल्या शाखेतील पदव्युत्तर पदविका किंवा पदवी.

८.३ दि. ३१ मे २०१७ या दिनांकापुर्वी अथवा दिनांकास आंतरवासियता (Internship) पूर्ण असणारे उमेदवारच पात्र ठरतील.

**८.४ शुध्द आयुर्वेद / B.A.M.S. शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांनी या पदासाठी अर्ज करु नयेत.**

९) **निवड प्रक्रीया** :-

| तपशिल | एम.बी.बी.एस. शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण (Weightage) | पदव्युत्तर / पदविका शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण (Weightage) |
|---|---|---|
| पदवी परीक्षेच्या सर्व वर्षामध्ये मिळालेले सरासरी गुण | ६०% (जास्तीत जास्त ६० गुण) | लागू नाही. |
| पदव्युत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षेमध्ये मिळालेले सरासरी गुण | लागू नाही. | ६०% (जास्तीत जास्त ६० गुण) |
| शासन सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर अस्थायी किंवा बंधपत्रित स्वरुपात केलेली एकुण सेवा | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| शासन सेवेत नसल्यास पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन झालेले एकुण वर्ष | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |

**टिप** :-

(१) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

(२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१०१०/३९०/प्र.क्र.३६६/सेवा-३, दि. १९ जुन २०१० अन्वये आदिवासी भागातील आरोग्य संस्था घोषित करण्यात आल्या असून, सदर आरोग्य संस्थांमधील वैद्यकीय अधिकारी पदावरील कामाचा अनुभव मुल्यांकनासाठी विचारात घेण्यात येईल.

(३) उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधीत संस्था / कार्यालय यांचे प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील.

(४) उमेदवारांची सेवा ही प्रत्येक सहामाही मध्ये मोजण्यात येईल. सहा महिन्यापेक्षा कमी सेवेसाठी गुण (Weightage) देण्यात येणार नाहीत.

(५) अनुभवासाठीच्या गुणांच्या मुल्यांकनासाठी २० जुन २०१७ हा अंतिम दिनांक राहील.

(६) निवड प्रक्रियेसाठी विहीत करण्यात आलेल्या निकषानुसार गुणांचे मुल्यांकण करण्यासाठी सर्व गुणपत्रके / प्रमाणपत्रे यांच्या सांक्षांकित प्रती उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल करण्यात येईल.

(७) प्राप्त अर्जाची छाननी करुन दि. २६ ऑक्टोबर २०१६ च्या शासन परिपत्रकानुसार गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत व दि. २४ जुन २०१६ च्या शासन परिपत्रकात नमुद विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

(८) केवळ गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्तीच्या ठिकाणाच्या पसंतीक्रम दर्शविण्याकरिता समुपदेशनाकरिता बोलविण्यात येईल.

(९) समितीने सादर केलेली गुणवत्ता यादी आणि उमेदवारांच्या नियुक्तीचा पसंतीक्रम याची तपासणी करुन उमेदवारास नियुक्ती आदेश www.nandurbar.nic.in या शासन संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(१०) नियुक्ती आदेशानंतर संबंधीत वैद्यकीय अधिकारी नियुक्तीच्या ठिकाणी रुजु झाल्यानंतर त्यांची सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद करण्यात येईल.

(११) **नवनियुक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी मुख्यालयी राहणे अत्यावश्यक राहील. त्यांचे वेतन हे बायोमेट्रीक हजेरीशी संलग्न असेल.**

(१२) **सर्वसाधारण**

११.१ निवड झालेले उमेदवारांना दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी असेल.

११.२ महाराष्ट्र वैद्यकीय आणि आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००+ग्रेड वेतन रु. ६६००) या पदावर पदोन्नतीकरिता उमेदवारास संधी असून, त्यासाठी त्या पदाकरिता आवश्यक असलेल्या अर्हता पूर्ण करणे आवश्यक राहील.

११.३ निवड झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. परंतु त्यांना नियमानुसार व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय राहील.

११.४ निवड झालेल्या उमेदवाराने ते किमान ५ वर्षाची शासकीय सेवा करतील किंवा न केल्यास शासनाने वेळोवेळी विहीत केलेली रक्कम दंड म्हणून भरण्यास तयार आहेत असे बंधपत्र देणे अनिवार्य असेल.

११.५ निवड झालेल्या उमेदवाराने महाराष्ट्र मेडीकल कौन्सील ॲक्ट, १९६५ (महाराष्ट्र XLVI, १९६५) किंवा इंडियन मेडीकल कौन्सील ॲक्ट १९५६ (१९५६ चा १०२) नुसार त्याचे / तिचे नांव नोंदविणे अनिवार्य आहे.

(१३) **जिल्हा पातळीवरुन जिल्हा निवड समिती मार्फत नियुक्ती देण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नियुक्ती आदेश शासनास सादर करणेत येतील. निवड झालेल्या उमेदवारांची आरक्षण स्थिती (खुला / मागास प्रवर्ग) बाबत तो बिन्दु राज्याच्या एकुण रिक्त पदांच्या बिन्दुमध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येईल. व त्यानुसार वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदाची बिन्दु नामावली राज्यस्तरावर विहीत करण्यात येईल. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

(१४) **मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांच्या जात प्रवर्गाच्या माहितीसह आवश्यक ती सर्व कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.**

(१५) **महत्वाचे**

१२.१ उमेदवारांनी १०० रुपयांच्या मुद्रांकपत्रावर नोटरी समोर आवेदनपत्रात नमुद केलेल्या माहितीच्या अचूकतेबाबत आणि सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.

१.२ प्रतिज्ञापत्राचा नमुना www.nandurbar.nic.in / www.nandurbar.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१२.३ आवेदन पत्रासोबत सदर प्रतिज्ञापत्र जोडून पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा आवेदनपत्र अपूर्ण समजून फेटाळले जाईल.

१२.४ मुलाखतीच्या वेळेस / प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेवेळी उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

(१६) **अर्ज.**

१३.१ सदर अर्ज www.nandurbar.nic.in / www.nandurbar.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २२/०६/२०१७ पासुन उपलब्ध होतील.

१३.२ उमेदवाराने खाली नमुद केलेल्या शुल्काचा **राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट जिल्हा शल्यचिकित्सक, नंदुरबार यांच्या नावे काढून अर्जासोबत जोडावा** आणि संपूर्ण भरलेला अर्ज नमुद केलेल्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती व मुळ प्रतिज्ञापत्र त्यासोबत जोडावे.

१३.३ मुळ प्रतिज्ञापत्र व आवश्यक कागदपत्रांसह पूर्ण भरलेला अर्ज **जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार या कार्यालयात दिनांक २२/०६/२०१७ ते ०१/०७/२०१७ पर्यंत सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत प्राप्त होईल या बेताने सादर करावा.**

१३.४ उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

१३.४ ऑनलाईन अर्जाच्या उपलब्धतेसंबंधी कोणतीही अडचण असल्यास उमेदवाराने दूरध्वनी क्रमांक ०२५६४-२१०२३५ वर संपर्क साधावा.

(१७) उमेदवारांनी मुलाखतीसाठी (Walk-in-interview) दिनांक ०३/०७/२०१७ रोजी मुळ कागदपत्रांसह मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे कार्यालयात सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे.

(१८) **शुल्क**

अ) सर्व उमेदवारांसाठी रु. ५००/-

ब) फक्त राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे शुल्क स्विकारले जाईल.

**स्थळ :- नंदुरबार**
**दिनांक :- २०/०६/२०१७**

**(डॉ. आर.वी. पवार)**
**सदस्य सचिव तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**

सही/-xxx
**(डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी)**
**अध्यक्ष तथा**
**जिल्हाधिकारी, नंदुरबार**

**महत्वाची सुचना :-**

१) उमेदवारांनी मुळ अर्जासोबत यादीतील नमुद कागदपत्रांच्या साक्षांकित छायांप्रतीचा एक संच सादर करणे बंधनकारक आहे.

२) **उमेदवारांनी M.B.B.S. शैक्षणिक वर्षातील सर्व गुणपत्रके (अनुत्तीर्ण झालेल्या वर्षातील गुणपत्रकासह) सादर करणे आवश्यक राहील.**

३) **अर्जात M.B.B.S. शैक्षणिक वर्षातील (४ वर्षे) वर्षनिहाय प्राप्त गुण व गुणांची टक्केवारी अचुक पणे भरावी.**

४) तसेच सोबतच्या पृष्ठावरील सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. सदर सुचनांचे अवलोकन केल्यानंतरच अर्ज भरावा

## अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांसाठी सुचना

- **खेळाडू उमेदवारांसाठी आवश्यक अर्हता :- जहिरातीमध्ये नमुद पदांसाठी अर्ज सादर करणाऱ्या खेळाडू उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे अर्हता धारण करणे / असणे आवश्यक आहे.**

(१) खेळाडू हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याला मराठी भाषेचे ज्ञान असावे.

(२) खेळाडूने सदर पदांसाठी सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

(३) सदर पदांसाठी त्या-त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महराष्ट्र ऑलिंपीक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहील. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करण्यात येणार नाही. राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये (N.C.C.) अंडर ऑफिसर्सची रँक मिळवून राष्ट्रीय छात्र सेनेच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

(४) खेळाडूंची कामगिरीविषयक प्रमाणपत्र संबंधित खेळांचे राष्ट्रीय फेडरेशनचे सचिव, संबंधित खेळाचे राज्य संघटनेचे सचिव या प्राधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र विहित नमुन्यांत असणे आवश्यक आहे. या पदांवर ज्या खेळाडूंची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून शासन निर्णय दि. ३०/०४/२००५ मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे आहेत किंवा नाहीत हे तपासून घेण्यात येईल.

(५) भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ग्रामिण व महिला क्रिडा स्पर्धांतील प्रथम, द्वितीय तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक प्राप्त खेळाडू भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रिडा स्पर्धांतील प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक प्राप्त खेळाडू उमेदवार खेळाडू प्रवर्गासाठी राखीव पदांसाठी अर्ज करु शकतील.

(६) खेळाडूंना आरक्षण ठेवण्याबाबत शासन निर्णय क्र. राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२/, दि. ३०/०४/२००५ शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२. दि. २१/०६/२००६, शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि. १८/११/२००६, शासन निर्णय क्र.क्रीस्पर्धा-२१०८/ (प्र.क्र.४४०/०८)/क्रीयुसे-२, दि. २०/०९/२०१३, शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दि. ३०/१२/२०१३ आणि वेळोवेळी निर्गमीत झालेल्या शासन निर्णयांमधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(७) अर्ज सादर केल्यानंतर नियुक्तीस पात्र ठरणाऱ्या खेळाडू उमेदवारांचे खेळाबाबतचे प्रमाणत्र हे क्रीडा संचालनालय, पुणे यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन वैध असलेचे मुळ प्रमाणपत्र असल्याशिवाय खेळाडू प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश दिला जाणार नाही.

- **महिला आरक्षण**

महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दि. २५/०५/२००१ आणि तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी सन २०१७-१८ या कालावधीकरिता वैध असलेले (दि. ३०/०६/२०१७ पर्यंत वैध असलेले) उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

- **मागासवर्गीयांच्या जात वैधता प्रमाणत्राबाबत**

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र./बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२/१२/२०११ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना निवड झालेल्या दिनांकापासुन ६ महिन्याचे आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करणेत येईल.

- **अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे**

(१) भारतीय नागरीक असल्याबाबतचे प्रमाणत्राची (Nationality) साक्षांकित छायाप्रत.

(२) महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणत्राची (Domicile) साक्षांकित छायाप्रत.

(३) महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची साक्षांकित छायाप्रत व परीक्षा प्रमाणपत्राची (Board Certificate) साक्षांकित छायाप्रत.

(४) महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची साक्षांकित छायाप्रत व परीक्षा प्रमाणपत्राची (Board Certificate) साक्षांकित छायाप्रत.

(५) **वैद्यकीय अधिकारी (M.B.B.S.) पदासाठी** :- सांविधिक विद्यापीठाची M.B.B.S. पदवी किंवा विनिर्दिष्ट केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण करीत असलेबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.

(६) **वैद्यकीय अधिकारी (विशेषज्ञ) पदासाठी** :- सांविधीक विद्यापीठाची बालरोग चिकीत्सा किंवा शल्यचिकीत्सा किंवा औषध वैद्यक किंवा स्त्रीरोग चिकित्सा किंवा बधीरीकरण किंवा मनोविकृतीशास्त्र किंवा नत्रशल्यचिकित्सा किंवा क्ष-किरण शास्त्र किंवा विकृती शास्त्र किंवा अणुजीव शास्त्र किंवा शरीर किंवा रक्तसंक्रमण या विशेषज्ञ शाखेतील भारतीय वैद्यकिय परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या शाखेतील पदव्युत्तर पदविका किंवा पदवी धारण करीत असलेबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.

(७) सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र.मवैअ-१०१०/३९०/प्र.क्र.३६६/सेवा-३, दि. १९ जुन २०१० अन्वये आदिवासी भागातील आरोग्य संस्था घोषित करण्यात आल्या असून, सदर आरोग्य संस्थांमधील वैद्यकिय अधिकारी पदावरील कामाचा अनुभव असलेबाबत प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.

(८) आंतरवासियता (Inernship) पुर्ण असलेबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.

(९) उमेदवारांनी १०० रुपयांच्या मुद्रांकपत्रावर नोटरीसमोर आवेदनपत्रात नमुद केलेल्या माहितीच्या अचुकतेबाबत आणि सत्यतेबाबतचे मुळ प्रतिज्ञापत्र.

(१०) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.

(११) जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे विहित शुल्काचा राष्ट्रीयकृत बँकेचा मुळ डीमांड ड्राफ्ट जिल्हा शल्यचिकित्सक, नंदुरबार यांच्या नावे काढून अर्जासोबत जोडावा.

(१२) शाळा सोडल्याचा दाखल्याची (L.C. / T.C.) साक्षांकित छायाप्रत.

(१३) सामाजिक आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांनी (मागासवर्गीय) मुळ जात प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत व उपलब्ध असल्यास मुळ जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.

(१४) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) मधील कलम-४ (२) (दोन) मधील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५, दि. ३०/०६/२००६ सोबतच्या सुधारित नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी दि. २० जुन २०१७ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन-क्रिमीलेयर) मुळ प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.

(१५) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५/०५/२००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षण अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी दि. २० जुन २०१७ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेयर) मुळ प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.

(१६) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्र./राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि. ३०/०४/२००५ मधील तरतुदीनुसार मुळ खेळाडु प्रमाणपत्र हे सदर शासन निर्णयालगतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांचे असावे.

(१७) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतुदीनुसार आवश्यक अर्हता म्हणुन विहित नमुन्यातील लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

(१८) छायाचित्र ओळख पुरावा (ओळखपत्र / Photo Identity Card) (आधार कार्ड / राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र ड्रायव्हिंग लायसन्स इ.) ची साक्षांकित छायाप्रत.

(१९) मुलाखतीच्या दिवशी सर्व मुळ कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(२०) सर्व कागदपत्रांची व निकषांची पुर्तता झाल्याशिवाय उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

---

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**RECRUITMENT FOR MEDICAL OFFICER GROUP-A**

| | | | |
|---|---|---|---|
| **Post Applied For :** | MEDICAL OFFICER GROUP-A | | |
| Name | | | Recent passport size photograph |
| Name in Marathi | | | |
| Fathers / Guardians Name | | | |
| Mothers Name | | | Candidate Signature (In box) |
| Fathers / Guardians Occupation | | | |
| Gender | Male / Female : | Marital Status | |
| Date of Birth | / / | Age as on (30.06.2017) | |
| Mother Tongue | | Email-ID | |
| Contact No. | | | |
| Correspondence Address | | | |
| Correspondence Address in Marathi | | | |
| Permanent Address | | | |
| Whether Spouse working with Govt. Department ? | | Spouse Place of Posting | |
| Profession of the Spouse | | | |
| Reservation | | | |
| Category | | Caste Certificate | |
| Caste | | Sub-Cast | |
| Non-Creamy Layer Certificate | | Annual Income | |
| Social Reservation | | | |
| Physically Handicapped | | | |

**Fees Details :**

| Sr. no. | Demand Draft no. | Amount | Bank Name |
|---|---|---|---|
| | | | |

**General Information :**

| | | | |
|---|---|---|---|
| Possesse Adequate Knowledge to read, write and speak Marathi Language | | | |
| Date of Completion of Compulsory Rotating internship (DD/MM/YYYY) | | | |
| Date of Registration (DD/MM/YYYY) | Registration Number | Date of Renewal (If any (DD/MM/YYYY)) | |
| Has successfully completed MS-CIT ? | | | |
| Preffered area of posting | Advertise was published for Akkalkuwa & Dhadgao taluka's only. | | |

| MBBS Yearwise Marks : | | |
|---|---|---|
| **Year** | **Marks** | **Out of Marks** |
| 1st year | | |
| 2nd year | | |
| 3rd year | | |
| 4th year | | |
| **Total** | | |
| **Percentage Marks in MBBS** | | |
| Has any other Post Graduate Deree / Diploma in other Medical subject | | |
| Subject | | |

**Qualifying Examination :**

| Sr no | Faculy | Programm | Specialisation | Board / University | Passing year | Class | Total marks obtained | Total out of marks | Percentage |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**Experiance :**

| Sr. no. | Post Held | Organisation Name | Organisation Address | Nature of Appointment | Is the office / Institution owned by Govt. of Maharashtra | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| Sr. no. | Exact date to be given (from-to ) | Total period (YYYY/MM/DD ) | Scale of pay | Basic Pay (In Rs.) | Nature of Post | Resons for leaving along with discharge certificate |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| Total Experience | | |
|---|---|---|
| | (A) Befor essential Qualification | |
| | (B) After essential Qualification | |
| | (C) After higher Qualification | |

**Required Documents**

| Sr. no. | Documents |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

I hereby declare that all the information furnished by me in this application from are true, complete and correct to the best of my knowledge and bilief. I do understand that I need to obtain and produce all the required original certificates enlisted in the form by me at the time of document verification. I understand that entries made by me in this application from are final and binding on me. I further declare that in the event anyinformation being found fals or incorrect I shall be liable for disqualification as mentioned in the notification.

**Place :**

**Date : / /2017**

**Candidate Full Name & Signature**

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना-अ**

**(प्रतिज्ञापन (नियम-४ पहा)**

मी श्री. / श्रीमती / कु. ------------------------------------------------ श्री. (वडीलांचे / पालकाचे नांव) -------------------------------------------- यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी वय ______ वर्षे राहणार ---------------------- याद्वारे पुढीलप्रमाण असे जाहिर करितो / करितो की,

(१) मी -------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.
(२) आज रोजी मला _______ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या _______ आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)
(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिन असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदूनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-     /     /२०१७

अर्जदाराची **सही / नांव**

# Affidavit

Affidavit to be furnished by a person along with the Application for the post of Medical Officer MMHS Group-A in the pursuance of the Advertisement Number ....... Dated ——— published by Selection Board for Medical Officer Reecruitment. Established by Public Health Department.

Govt. of Maharashtra.

I, ______________________ Son / daughter / wife of __________ ______________________ Aged about _____ years, resident of ______________________ ______________________ do hereby solemnly affirm/state on oath as under :-

(1) I have submitted my application for the post of ______________________ in pursuance of the Advertisement No. ____ dated / /2017.

(2) I have read the provision in the Rules and Notification of the Selection Board carefully and I hereby undertake to abide by them. I further decalre that I fulfill all the conditions of eligibility regarding are limits, educational qualifications, experience if any, concession etc. prescribed for the post herein above.

(3) I hereby declare that, all the statements made in this application are true, complete and correct to the best of my knowledge & belief. In the event if my information being fournd false or incorrect or I am detected eneligible, I am liable to be dismissed from service.

(4) If information given in this Afficavit on oath is found to be false i.e. not suported by documentary proof at the time of verification by the selection Board, I will be liable to be Blacklisted and Debarred from all further examinations and selection processes of the Selection Board, and liable for disciplinary proceedings if already in Government Service.

**Place :**

**Date :** **Signature of Deponent**

---

# VERIFICATION

I, the above named deponent do hereby verify and declare that the contents of this Afificavit are true and correct to the best of my knowledge and belief. No part of it is false and nothing material ha been concealed therein.

Verified at ______________ this ______________________ Day of / /2017

Deponent

**Notary Seal**